(२०) तुझे माझे नाते १९५३

सख्या ... पान २९

नको सांगू सख्या मला
चंद्र चांदण्यांच्या कथा
मातीतल्या अंकुरांच्या
त्यांना कशा ठावे व्यथा ?

सेजारल्या तारकांना
काय कोरांटीचे काटे ?
निर्माल्यात हसतांना
अबोलीचे दु:ख मोठे !

सारा दु:खाचा दुस्वास
सुखासाठी आटापिटा
शोधण्यासी किनाऱ्याला
सागराची खार लाटा

नाही आवणार तुला
माझे हिशोबी बोलणे
अर्थाविण जुळणारे
तुझे तुला गोड गाणे

सारा देव शोध यांचा
आहे भाकीत बोभाटा

देव दानवांच्या कथा
कसा इतिहास खोटा ?

सख्या अनंताचे बिंदु
अंधारते प्रकाशते
सत्य, दृष्टि-सृष्टि पुढे
फक्त तुझे माझे नाते

30/७०
२४/३/७८

सहदेव मस